मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड महापालिकेची 522 कोटींची कर वसुली!

## पहिल्या तिमाहीत 4 लाख 12 हजार मालमत्ताधारकांनी जमा केला कर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये म्हणजेच अवघ्या ९० दिवसांमध्ये तब्बल ५२२ कोटी ७२ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच पहिल्या तिमाहीत कर वसुलीचा पाचशे कोटींचा आकडा पार करून ऐतिहासिक कामगिरी महापालिकेने केली आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ९६६ कोटींची मालमत्ता कर वसुली केली होती. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये हा आकडा पार करण्यासाठी महापालिकेने सुरुवातीपासून नियोजन केले आहे. पहिल्या तिमाहीमध्येच जास्तीतजास्त कर वसूल व्हावा, यासाठी ३० जून २०२५ पर्यंत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यासह विविध सवलती महापालिकेने जाहीर केल्या होत्या. या सवलतींना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. १ एप्रिल २०२५ ते ३० जून २०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत तब्बल ४ लाख १२ हजार मालमत्ताधारकांनी कर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे.

आर्थिक वर्ष २०२१-२२ ते आर्थिक वर्ष २०२५-२६ या पाच आर्थिक वर्षांच्या पहिल्या तिमाहीत होणाऱ्या कर संकलनाची आकडेवारी पाहता यंदाच्या वर्षी पहिल्या तिमाहीत कर संकलनात विक्रमी वाढ दिसून आली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये पहिल्या तिमाहीत १७१.८५ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये २५३.६५ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये पहिल्या तिमाहीत ४५४ कोटी रुपये तर २०२४-२५ मध्ये पहिल्या तिमाहीत ४४० कोटी रुपयांची कर वसुली झाली होती. यंदा मात्र ३० जून २०२५ पर्यंत ५२२ कोटी ७२ लाखांची वसुली झाली आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाने केलेले नियोजन, सीएचडीसी प्रकल्प अंतर्गत डेटा विश्लेषण करून त्याआधारे विविध माध्यमातून केलेली जनजागृती मोहिम, बचत गटांमार्फत घरोघरी पोहोचवण्यात आलेली मालमत्ता करांची बिले, कर संकलन विभागाच्या विविध सवलतींना नागरिकांना दिलेला प्रतिसाद, यासर्वांमुळे यंदा आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत ५२२ कोटींचा कर वसुलीचा टप्पा पार झाला आहे. ही कामगिरी करण्यासाठी महत्त्वाचे योगदान असणाऱ्या करदात्यांसह सर्व विभागीय अधिकारी, कर्मचारी, बचत गटातील महिला यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.**

**कर सवलतीचे लाभार्थी**

महिला मालमत्ताधारक: १७ हजार ४५९

माजी सैनिक: ४ हजार २३

दिव्यांग मालमत्ताधारक: १ हजार ८९७

शौर्यपदधारक: ९

पर्यावरणपूरक मालमत्ता: २४ हजार ८६९

आगाऊ भरणा : ४० हजार ९३४

ऑनलाइन कर भरणा करणारे: ३ लाख २३ हजार २३९

एकूण लाभार्थी संख्या : ४ लाख १२ हजार ४३०

# सर्वसामान्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवू नका

## डीपी विरोधात नागरिकांचा महापालिकेवर आक्रोश मोर्चा; प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

थेरगाव, वाल्हेकरवाडी, चिंचवडेनगर, बिजलीनगर, रहाटणी परिसरातील संतप्त रहिवाशांनी प्रारूप विकास आराखड्याच्या विरोधात (डीपी) विरोधात पिंपरी-चिंचवड महापालिका भवनावर सोमवारी (दि.30) आक्रोश मोर्चा काढला. दाट लोकवस्तीतील प्रशस्त रस्त्यांचे तसेच, रिंग रोडचे (एचसीएमटीआर) आरक्षण रद्द करण्याची आग्रही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. घोषणाबाजी करीत महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न करण्यात आला.

मोर्चा सोमवारी सकाळी दहाला चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू झाला. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. आमच्या हक्काचं घर रिंगरोडमध्ये जाणार नाही.

डीपी रद्द झाला पाहिजे, असे फलक अनेकांच्या हातात होते. हा मोर्चा मोरवाडी चौक मार्गे महापालिका भवनाच्या प्रवेशद्वाराजवळ आला. तेथे मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. मोर्चात शेकडो नागरिक सहभागी झाले होते.



डीपीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवण्याचा घाट महापालिका प्रशासन घातला आहे. आयुष्यभर मेहनतीने उभे केलेले सामान्य नागरिकांची घरे डीपीच्या माध्यमातून पाडण्याचा प्रयत्न प्रशासन करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

भर पावसातही आंदोलन सुरू होते. महापालिकेने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर पुढचा मोर्चा थेट विधानभवनावर नेऊ, असा स्पष्ट इशारा आंदोलकांनी दिला. यानिमित्ताने त्या परिसरात बंद पाळण्यात आला.

स्वाभिमानी घर बचाव संघर्ष चळवळीच्या माध्यमातून आंदोलन करण्यात आले. आंदोलनात स्वाभिमानी घर बचाव संघर्ष चळवळीचे मुख्य समन्वयक धनाजी येळकर पाटील, शिवाजी इबीतदार, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, बाबा कांबळे, अजिज शेख, संजय जाधव, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रवीण कदम, सतीश काळे, मराठवाडा जनविकास संघाचे अरुण पवार, मनोज पाटील, किशोर पाटील, राजश्री शिरवळकर, ज्योती भालके, देवेंद्र भदाणे, सतीश नारखेडे, ॲड. प्रतिभा कांबळे, गणेश सरकटे, देवेंद्र खोकर, विद्या पंडित, शिवाजी पाटील, रमेश पिसे, बालाजी ढगे, रामचंद्र ढेकळे, रामलिंग तोडकर, छावाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र शिंदे, विष्णू बिरादार आणि रहिवाशी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# सर्व्हर डाऊन झाल्याने मिळकत कर भरण्यास अडचणी

## 7 जुलैपर्यंत कर भरण्यास मुदतवाढ: करभरणा केंद्रापुढे नागरिकांच्या रांगा

**पुणे | प्रतिनिधी**

सवलतीच्या दरात मिळकत कर भरण्याचा 30 जून हा शेवटचा दिवस असल्याने शहरातील विविध कर भरणा केंद्रांवर कर भरण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली. यामुळे पालिकेच्या सर्व्हरवर ताण आल्याने दिवसभर सर्व्हर डाऊन होता. परिणामी, अनेक नागरिकांना कर भरताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

नागरिक तब्बल 3 ते 4 तास रांगेत उभे होते. दरम्यान, सवलतीच्या दरात कर भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी होत होती. ही मागणी आयुक्तांनी मान्य करीत 7 जुलैपर्यंत कर भरण्यास मुदतवाढ देण्यात आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

चालू आर्थिक वर्षात मिळकतकर विभागाने 3250 कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्याचे उदिष्ट ठेवले आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त मिळकत कर भरावा यासाठी या वर्षी पालिकेने 30 जून पर्यंत करतात 5 ते 10 टक्के सवलत दिली होती. मे महिन्यापासून ही करवसूली सुरू करण्यात आली होती. सोमवार सवलतीचा लाभ घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने मोठ्या प्रमाणात नागरिकांनी कर भरण्यास सुरुवात केली.

अनेक नागरिकांनी ऑनलाईन तर काहींनी क्षेत्रीय कार्यालयानुसार असलेल्या करभरणा केंद्रात जाऊन कर भरला. यामुळे अनेक केंद्रांवर नागरिकांचा रांगा लागल्या होत्या. चार ते पाच तास रांगेत थांबून देखील अनेकांना कर भरता आला नाही.

तर सर्व्हर डाऊन असल्याने ऑनलाइनदेखील कर भरता येत नव्हता. त्यामुळे महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रांसह क्षेत्रीय कार्यालयात असलेल्या कर भरणा केंद्रावर नागरिकांनी गर्दी केली होती. नागरिकांना झालेला त्रास लक्षात घेत 7 जुलैपर्यंत सवलतीमध्ये मिळकतकर भरण्यास महापालिकेने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला.




> मोठ्या प्रमाणात नागरिकांनी कर भरण्यास सुरुवात केल्याने सोमवारी सर्व्हरवर ताण आला. यामुळे काही नागरिकांना महापालिकेचा मिळकतकर भरण्यास अडचण आली. नागरिकांची झालेली गैरसोय बघता त्यांना पुन्हा सवलतीमध्ये मिळकतकर भरता यावा यासाठी सात दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. 7 जुलैपर्यंत मिळकत कर नागरिकांना भरता येणार आहे. त्यामुळे ऑनलाईन पर्यायासह महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात मिळकत कर भरावा.
>
> **- अविनाश सकपाळ, उपायुक्त, मिळकत कर विभाग, पुणे महापालिका.**

### 1245 कोटींचा महसूल पालिकेच्या तिजोरीत

**» 1 मे पासून 30 जूनपर्यंत पाच ते दहा टक्के सवलत महापालिकेडून दिली जात होती. या काळात 7 लाख 10 हजार पेक्षा अधिक नागरिकांनी या सवलतीच्या फायदा घेत सुमारे 1245 कोटी रुपयांचा महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे, अशी माहिती मिळकत कर विभागाचे उपायुक्त अविनाश सकपाळ यांनी दिली.**

# विमानतळ परिसरात दिवसभर श्वानांची धरपकड

## धावपट्टीवर श्वान आल्याने विमानाला एक तास विलंब झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर मोहीम

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर श्वान असल्याने विमानाला एक तास विलंब झाल्याची घटना शनिवारी घडल्यानंतर विमानतळ प्रशासन आणि हवाई दलाने महापालिकेच्या श्वान पथकाला पाचारण करून श्वानांची धरपकड मोहीम राबवली. सोमवारी दिवसभर चाललेल्या या मोहिमेत पाच श्वान पकडण्यात आले. विमानतळ परिसरात शंभराहून अधिक मोकाट श्वान असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

पुणे विमानतळाच्या लगतच्या परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असल्याने केरकचरा, अस्वच्छता असते. त्यामुळे पक्षांसोबत मोकाट जनावरांचा वावर असतो. विमानतळ परिसरात पक्ष्यांचे थवे असल्याने विमानांच्या उड्डाणांमध्ये अडथळे येत आहेत. धावपट्टी आणि लगतचा परिसर यातील अंतर फारसे नसल्याने तारेचे कुंपण आणि तडे गेलेल्या भिंती ओलांडून श्वानांचा मुक्त संचार सुरू असल्याने विमानांना अडथळे निर्माण होत आहेत. काही दिवसांपूर्वी परिसरात बिबट्याही आढळून आला होता. याचा फटका विमान सेवेबरोबर प्रवाशांना बसत आहे.

विमानतळावरून हवाई उड्डाणांना पक्ष्यांचा धोका कमी व्हावा, तसेच श्वानांचा मुक्त संचार कमी करण्यासाठी हवाई दलाने पाच सदस्यांचे स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. तसेच 'हाय डेसिबल झोन गन'ने पक्ष्यांना परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

याबाबत हवाई वाहतूक तज्ज्ञ धैर्यशील वंडेकर म्हणाले, 'अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील विमानांच्या सुरक्षिततेसाठी अधिक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. भविष्यात पुणे विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्यात येणार असताना झपाट्याने होणारे नागरीकरण आणि आजूबाजूच्या लोकवस्तीचा विचार करून विस्तारीकरण करावे लागणार आहे. विमानतळ परिसरात मोकाट जनावरे, पक्ष्यांना प्रतिबंध घालण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.'




> महानगरपालिकेचे श्वान पथक हे धावपट्टीजवळील श्वानांच्या नोंदींवर लक्ष ठेवते. आम्ही त्यांना स्थलांतरित करू शकत नाही. मोकाट श्वानांना परिसरातून हटविण्यासाठी विमानतळ प्रशासन आग्रही असले, तरी श्वानप्रेमी विरोध करत असल्याने अडचणी येत आहेत.
>
> **- शैलेंद्र चव्हाण,अधिकारी, श्वान पथक, पुणे महापालिका.**

# उलाढाल कोट्यवधींची, सुविधा मात्र 'दुय्यम'

## 16 कोटी 52 लाखांचे उत्पन्न मिळवूनही पाचही निबंधक कार्यालयांचा बोजवारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पायाभूत सुविधांचा अभाव, दस्तासाठी लागणारा वेळ, जुना दस्त मिळण्यासाठी मारावे लागणारे हेलपाटे आणि पक्षकरांना मिळणारी दुय्यम वागणूक अशी स्थिती पिंपरी चिंचवड शहरातील सह दुय्यम निबंधक कार्यालयाची आहे. हवेली अंतर्गत असलेल्या पाच कार्यालयांत या वर्षात जवळपास 16 कोटी 52 लाख रुपयांचा महसूल जमा झाला आहे. मात्र, त्या बदल्यात सुविधा मिळत नसल्याची खंत नागिरकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



**नागरिकांना बसायला जागा मिळेना**

राज्यात आता कोणात्याही ठिकाणांचा दस्त कोठेही नोंदला जात असल्याने गर्दी वाढत आहे. मात्र, सह दुय्यम निबंधक कार्यालयाकडून अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने या कार्यालयाच्या स्थितीबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी स्वच्छतागृहाची सोय नाही. पार्किंगचा अभाव असल्याने वाहने लांब पार्क करावी लागतात. तर, काही ठिकाणी पाणी पिण्यास नसल्याने विकत पाणी आणावे लागते.

अधिकारी व कर्मचारी योग्य वागणूक देत नाहीत. तर, तासनतास थांबावे लागत असल्याने बसण्यासाठीदेखील पुरेसी जागा मिळत नाही. ऑनलाईन सेवा असूनही कामे वेळेवर आणि गतीने होत नसल्याने नागरिकांनी खंत व्यक्त केली जात आहे.

### या आहेत समस्या

- कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी माहिती देत नाहीत
- नोंदणीसाठी अगोदर कळवूनही प्रत्यक्ष नोंदणीसाठी वेळ लागतो
- वाहन पार्किंग नसल्याने नागरिकांना करावी लागणारी पायपीट
- वेळखाऊ आणि मनमर्जी कामामुळे नागरिक हैराण
- नोंदणी पोर्टलच्या तांत्रिक अडचणी
- अधिकारी वेळेवर उपस्थित नसणे
- माहिती देण्यास टाळाटाळ

### कार्यालय नोंदणी (चालू वर्षातील)

- हवेली 5 चिंचवडगाव : 3 कोटी 93 लाख
- हवेली 14 लांडेवाडी, भोसरी : 2 कोटी 92 लाख
- हवेली 17 दापोडी : 2 कोटी 45 लाख
- हवेली 18 पिंपरी कॉलनी : 4 कोटी 60 लाख
- हवेली 26 पिंपरी : 2 कोटी 61 लाख

# मतदारांच्या नजरेत येण्यासाठी इच्छुकांची धडपड

## शहरातील 32 प्रभागात वाढली हालचाल; पक्ष कार्यकर्त्यांमध्ये संचारला उत्साह

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील २९ पैकी २८ महापालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. त्यापैकी काही महापालिकांच्या निवडणुका जवळपास दोन ते चार वर्षांपासून रखडल्या होत्या. पण, आता सर्वच निवडणुकांचा मार्ग खुला झाला आहे. त्यामुळे राज्यातील इतर महापालिकांप्रमाणे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीच्या तयारीसाठी सर्व पक्षांतील इच्छुकांमध्ये उत्साह संचारला आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी संबंधितांची धडपड सुरू झाल्याचे दिसत आहे.

शहरात मागच्या चार वर्षांपासून प्रशासकीय कारभार सुरू आहे. आता महापालिका निवडणूक दिवाळीअगोदर किंवा नंतर होऊ शकते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी सर्व पक्षांतील इच्छुकांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. या निवडणुकीत महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी सरळ लढत होणार की, दोन्ही आघाडीतील घटक पक्ष नेत्यांच्या हट्टासाठी स्वतंत्रपणे लढणार, हे आगामी काळात स्पष्ट होईल. तरी प्रत्येक प्रमुख पक्षाने स्वतंत्र निवडणूक लढवण्याच्या दृष्टीने जुळवाजुळव सुरू केली आहे.



मुंबईपाठोपाठ पिंपरी-चिंचवड आणि पुणे महापालिका निवडणुकीकडे सर्व राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. मुंबई वगळता या दोन्ही ठिकाणी २०१७ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांची एकहाती सत्ता होती. परंतु, महाराष्ट्रातील २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर राज्यांप्रमाणेच पिंपरी-चिंचवड शहरातील राजकारणाने कुस बदलली. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीन मतदारसंघांपैकी दोन मतदारसंघात भाजपने सत्ता मिळवली. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली आणि भोसरीचे आमदार पहिलवान महेश लांडगे यांना बरोबर घेऊन आमदार जगताप यांनी अजित पवार यांच्या सत्तेला सुरुंग लावला होता. ७७ नगरसेवकांच्या जिवावर महापालिकेत कमळ फुलवण्याची किमया केली होती. हा पराभव अजित पवार यांना फार जिव्हारी लागला होता. निवडणुका घेण्याच्या न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिलेल्या आदेशामुळे पक्षांतर करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे. गेली साडेतीन वर्षे निवडणूक लढवण्याची आहे म्हणून उत्सुक कार्यकर्ते संबंधित प्रभागात खर्च करत होते.

विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय कार्यक्रमांच्या माध्यमातून मतदारांच्या नजरेत येण्यासाठी इच्छुक धडपडत होते. मात्र, निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर न होता त्या पुढे पुढे ढकलल्या जात असल्याने बहुतांश इच्छुकांनी तलवारी म्यान केल्या होत्या. मात्र, न्यायालयाने फटकारल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी सुरू केल्यामुळे राज्यातील इतर महापालिकांप्रमाणेच पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक लढवू पाहणाऱ्या इच्छुकांनी तयारी जोरदार सुरू केली आहे. प्रभागातील मतदारांचा सर्वे करून त्यांना कोणत्या गोष्टी आवडतात त्याचा अभ्यास करून तसे कार्यक्रम आयोजित करणे सुरू केल्याचे दिसत आहे.

# ‘जीवघेणी’ अवजड वाहने आता जप्त

## पोलिसांकडून पाच वर्षांतील माहितीसंकलित; सहा महिन्यांत 140 जणांचा मृत्यू



**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या हद्दीत प्रमुख रस्त्यांवर डंपर, ट्रक, मिक्सर अशा अवजड वाहनांना बंदी असतानाही ही वाहने सर्रास रस्त्यांवरून धावत आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून, गेल्या वर्षी शहरात ३३४ प्राणांतिक अपघात (फेटल ॲक्सिडेंट) होऊन ३४५ जणांचा मृत्यू, तर यंदा जून महिनाअखेरीपर्यंत १४० जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे अपघातास जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांचा परवाना रद्द केला जाणार आहे. तसेच, अपघातास कारणीभूत ठरलेल्या गेल्या पाच वर्षांतील अवजड वाहनांची माहिती संकलित करून ती वाहने जप्त करण्यात येणार आहेत.

शहरातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर डंपर, ट्रक, मिक्सर अशा अवजड वाहनांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी आहे. तरीही सर्रास बंदी आदेश धुडकावून अवजड वाहने शहरात येतात. गेल्या आठवड्यात सिंहगड रोड परिसरातील तुकाईनगर येथे ट्रकच्या धडकेत महाविद्यालयीन तरुणीचा मृत्यू झाला. त्यामुळे अवजड वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न चर्चेत आला आहे.

‘शहरात गंभीर स्वरूपाच्या अपघातांमध्ये सहा महिन्यांत १४० जणांचा अपघाती मृत्यू झाला आहे. बहुतांश अपघात अवजड वाहनांमुळे झाले आहेत. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये दुचाकीस्वारांची संख्या जास्त आहे. अपघाती मृत्यूस जबाबदार अवजड वाहनांचा परवाना रद्द करण्यात येणार आहे, तसेच गेल्या पाच वर्षांत अपघातास जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांची माहिती गोळा करून ती वाहने जप्त करण्यात येणार आहेत,’ अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

अवजड वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू आहे. बंदी आदेश धुडकावून शहरात येणाऱ्या अवजड वाहनांविरुद्ध कारवाई करणयात येत आहे. यामध्ये परवाना रद्द करणे, वाहन जप्त करणे, तसेच न्यायालयीन कारवाईचा समावेश आहे. अपघाती मृत्यूस जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांची माहिती घेऊन त्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाणार आहे. पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडून ही कारवाई करण्यात येणार आहे.

> शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. बंदी आदेश धुडकाविणाऱ्या अवजड वाहनचालकांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे. अपघात प्रकरणात वाहन मालकांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत पोलिसांनी ३० ते ३२ वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल केले असून, दंडात्मक कारवाईही केली आहे.
>
> **- मनोज पाटील, अतिरिक्त पोलीस आयुक्त.**

> अवजड वाहनांमुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडतात. अवजड वाहनांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडून ही कारवाई केली जाईल.
>
> **– अमितेश कुमार, पोलीस आयुक्त.**

### अवजड वाहनांना 31 रस्त्यांवर बंदी

**» गंभीर अपघात, तसेच कोंडी सोडविण्यासाठी शहरात येणाऱ्या जड वाहनांना, तसेच मल्टिॲक्सल वाहनांना शहरातील सर्व मार्गांवर २४ तास प्रवेश बंदी करण्यात आली आहे. यामध्ये १० पेक्षा जास्तचाकी वाहने, कंटेनर, ट्रेलर अशा वाहनांचा समावेश आहे. सहा ते दहा चाकी ट्रक, टेम्पो अशा वाहनांना रेड झोन केलेले मार्ग वगळून रात्री ११ ते सकाळी ६ पर्यंत प्रवेश दिला जाणार आहे. या आदेशातून मुंबई- बंगळुरू बाह्यवळण मार्ग वगळण्यात आला आहे.**

---

# मुठा नदीवरील पुलांच्या खांबांवर पाणीपातळीच्या खुणा

## खडकवासला धरणापासून संगमवाडीपर्यंतच्या मुठा नदीवरील पुलांच्या खांबांवर खुणा



**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यात धरणातून नदीत पाणी सोडल्यानंतर तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे नदीच्या पातळीत किती वाढ झाली, हे निश्चित करण्यासाठी महापालिकेने पुलांच्या खांबांवर पाणी पातळीच्या खुणा (मार्किंग) करण्याचा निर्णय घेतला आहे. खडकवासला धरणापासून संगमवाडीपर्यंतच्या मुठा नदीवरील पुलांच्या खांबांवर या खुणा करण्यात येणार आहेत.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला हे आदेश दिले आहेत. यामुळे धरणातून नदीत किती पाणी सोडले की कोणत्या भागात पाणी शिरू शकते, याची माहिती महापालिका प्रशासनाला समजण्यास मदत होणार आहे. धरणातून विसर्ग केल्यानंतर. तसेच खुल्या पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्यामुळे नदीची पातळी नक्की किती वाढते, हे लक्षात यावे, यासाठी हे केले जाणार आहे. खडकवासला धरण ते संगमवाडीपर्यंत मुठा नदीपात्रातील विविध पुलांच्या खांबांवर या खुणा केल्या जाणार आहेत. यामुळे पूरस्थिती निर्माण झाल्यास नियोजन करणे सोपे होणार आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी नुकतीच शहरात पूरस्थिती निर्माण झाल्यास काय नियोजन करायचे, याचा आढावा घेण्यासाठी महापालिकेच्या विभागांची बैठक घेतली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. गेल्या वर्षी खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. त्याच वेळी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात पाऊस झाला होता. यंदाही मुठा नदीत अवघे दोन हजार क्युसेक पाणी सोडल्यानंतर भिडे पुलावरून पाणी गेले. त्यामुळे पूरस्थितीचा नेमका अंदाज घेऊन भविष्यातील उपाययोजनांसाठी ही आखणी करण्यात येणार आहे, असे दिवटे यांनी सांगितले.

### पाणीपातळीच्या खुणा करण्यात येणारे पूल

**» पुणे महापालिकेच्या हद्दीतील वारजे येथील बाह्यवळण मार्गावरील पूल, नरवीर तानाजी मालुसरे (सिंहगड) रस्त्यावरील राजाराम पूल, म्हात्रे पूल, एस. एम. जोशी पूल, तसेच लकडी पूल, काकासाहेब गाडगीळ पूल, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल, टिळक पूल, नवा पूल आणि संगमवाडी पूल अशा प्रमुख पुलांवर या खुणा केल्या जाणार आहेत.**